# दि डहाणू रोड जनता को- ऑप. बँक लि., डहाणू रोड

मुख्य कार्यालय : जनता बँक चौक, डहाणू रोड–४०१ ६०२. जिल्हा–पालघर, फोन (०२५२८) २२२२३६, फॅक्स नं. २२५५१८

## ८५ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

सभासदांस कळविण्यात येते की, बँकेची ८५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक **२५/०९/२०२२** रोजी दुपारी **३.००** वाजता दशाश्री माळी, वाणिक समाज हॉल, मसोली, डहाणू रोड येथील सभागृहात आयोजीत केली आहे. सदर सभेत खाली नमूद केलेल्या विषयांवर विचार करण्यांत येईल. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. मागील दिनांक २८/०९/२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. दिनांक ३१ मार्च २०२२ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रक मंजूर करणे व वैधानिक लेखा परिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

३. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार सन २०२१-२०२२ या वर्षाच्या नफा विभागणीस मंजूरी देणे.

४. आर्थिक वर्ष सन २०२२-२०२३ साठी वैधानिक व अंतर्गत लेखापरिक्षकाची नियुक्ती करणेबाबत.

५. सन २०२२-२०२३ साठी संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

६. सन २०२०-२०२१ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.

७. बँकेची नवीन इमारत बांधकामाबाबत झालेल्या सर्व व्यवहारास व खर्चास मान्यता देणे.

८. हया वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची रजा मंजूर करणे.

९. मा. अध्यक्ष यांचे पूर्वपरवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**जयंत ज. बारी**
वरिष्ठ व्यवस्थापक

ठिकाण : मुख्य कार्यालय, डहाणू रोड
दिनांक : ३०/०८/२०२२

### सभासदांस सूचना

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर उपरोक्त विषयांसाठी होईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२. वार्षिक सर्वसाधारण सभेतील विषयांच्या बाबत ज्या सभासदांचे काही प्रश्न वा सूचना असतील तर त्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी सात दिवस आधी कार्यालयीन वेळेत बँकेच्या मुख्य कार्यालयांत लेखी स्वरूपात कळवावे.

३. तपशीलवार अहवालाच्या प्रती, बँकेच्या मुख्य कार्यालयात व शाखा कार्यालयात उपलब्ध आहेत.

४. वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस व वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या वेबसाईट **www.dahanujanatabank.com** वर प्रसारित केली आहे.

५. कोविड–१९ संदर्भातील योग्य मार्गदर्शक तत्त्वे लागू होतील.